# दयानंद कला महाविद्यालय, लातूर




डॉ. आर.एस.पारवे

# 1857 च्या उठावाचे परिणाम

## 1)ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुष्टात आली

- कंपनीच्या धोरणामुळेच हा उठाव घडून आला
- 2 ऑगस्ट 1858 च्या कायद्यान्वये कंपनीची भारतावरील सत्ता संपुष्टात आली
- या कायदयानसार भारताचे शासन ब्रिटिश पार्लमेंट कडे सोपवण्यात आले
- भारतीय प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत मंत्री नेमण्यात आला
- भारत मंत्र्याच्या मदतीला इंडिया कौन्सिलची स्थापना
- या कायद्यानुसार गव्हर्नर जनरल ला व्हाईसराय झाला

# 2) विक्टोरिया राणीचा जाहीरनामा

भारतीयांचा विश्वास संपादन करण्यासाठी 1 नोव्हेंबर 1858 रोजी राणी व्हिक्टोरिया चा जाहीरनामा घोषित केला

- या नुसार ब्रिटिश सरकार साम्राज्य विस्तार करणार नाहीत
- भारतीय राजे व संस्थानिक यांच्यासोबतच्या करारांचे पालन करु
- धार्मिक सहिष्णुतेच्या नितीचे पालन केले जाईल
- भारतीयांना समानतेची वागणूक दिली जाईल
- कायद्याद्वारे सर्वांना समान मानले जाईल
- पक्षपात न करता शिक्षण आणि नोकरीत भारतीयांना समान संधी
- ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या न केलेल्या सर्व क्रांतिकारकांना  माफी

## 3) सैन्याची पुनर्रचना

- 1857 च्या उठावाची सुरुवात सैनिकांनी केली
- भारतीय सैन्याची संख्या कमी करून ब्रिटिश सैनिकांची संख्या वाढविली
- भारतीय सैनिकांना कमी महत्त्वाच्या जागेवर नियुक्त केले
- तोफखाना ब्रिटिश सैनिकांच्या ताब्यात
- भा. सैनिकांची जात, धर्म, वंश आणि प्रांत यानुसार विभागणी
- फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब

# 4)ब्रिटिशांच्या धोरणांमध्ये बदल

- ब्रिटिशांनी उठावानंतर देशी राज्याबद्दल नरमाईचे धोरण स्वीकारले
- देशी संस्थानिकांच्या हक्कांचे आणि अधिकारांचे संरक्षण करण्याची हमी
- भारतीय जागीरदार यांना पुन्हा जहागिरी बहाल केली
- राजा निपुत्रिक असेल तर दत्तक घेण्यास परवानगी
- राज्यकारभारात भारतीयांकडून सहकार्याची अपेक्षा

# 5) जातीय कटुता वाढली

- उठावा पूर्वी इंग्रज भारतीयांना आपले मित्र समजत
- भारतीयांच्या सण उत्सवात इंग्रज सहभागी होत असत
- क्रांती काळात हे चित्र पालटले
- भारतीय व इंग्रज यांच्यातील कटुता वाढली
- क्रांतीनंतर ब्रिटीश भारतीयाकडे संशयाच्या नजरेने पाहू लागले
- भारतीयांना 'ब्लॅक इंडियन' संबोधून अवमान करू लागले

## 6)आर्थिक शोषण वाढले

- उठावानंतर भारतातील तंबाखू चहा-कॉफी कापड इत्यादी उद्योग इंग्रजांच्या ताब्यात गेले
- भारतीय बाजारपेठेत इंग्रजांची मक्तेदारी
- भारतातील लघु व हस्त उद्योगाचा -हास झाला
- भारताच्या आर्थिक दारिद्र्यात वाढ

# 7) सामाजिक सुधारणा कडे ब्रिटीशांचे दुर्लक्ष

- ब्रिटिशांनी भारतात केलेल्या सामाजिक सुधारणास उठावास जबाबदार धरले
- भारतीय समाजातील अनिष्ठ प्रथा बद्दल कायदे करण्याच्या धोरणाचा त्याग
- परंपराप्रिय भारतीयांच्या सामाजिक सुधारणेकडे दुर्लक्ष

# 8) भारतीयांना प्रशासनात संधी

- क्रांती पूर्वकाळात भारतीयांना प्रशासनात संधी कमी
- भारतीयांना प्रशासनात सामावून घेण्याचे धोरण
- भारतीयांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेचे वाढ


Thank you